महाराष्ट्राचा मानबिं

# लोकमत

पृष्ठे : १०+४ = १४, किंमत : ₹ ३.००

सिंधुदुर्ग, सोमवार, दि. ३० जून २०१४

## अभिजीत हेगशेट्ये : दोडामार्ग येथील कार्यक्रमात प्रतिपादन

# शाहू महाराज शिक्षणाचे खरे प्रणेते

कसई दोडामार्ग : ब्रिटिश राजवटीत शिक्षण हक्काचा क्रांतिकारी कायदा करवीर संस्थानात करणारे भारतातील पहिले राज्यकर्ते छत्रपती शाहू महाराज यांनी बहुजन व मागास समाजातील मुलांनी शिक्षण घ्यावे म्हणून संस्थानात विविध जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरु केली. त्यामुळे आजच्या शिक्षणाचे छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने प्रणेते होते, असे प्रतिपादन नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये यांनी केले.

ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित छत्रपती शाहू महाराज जयंती समारंभात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे नवनिर्वाचित प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, स्थानिक नियामक समितीचे सदस्य भाई परमेकर, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर व विवेकानंद नाईक आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. पाटील यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श राज्याचा वारसा खऱ्या अर्थाने चालविणारे राजर्षी शाहू महाराज हे एकमेव राज्यकर्ते असून ते कृतिशील समाजसुधारकही होते, असे त्यांनी सांगितले.

बाबुराव धुरी यांनी शाहू महाराजांच्या प्रेरणतून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. स्वातंत्र्य सैनिक भाई परमेकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. पी. एन. ढेपे, आभार प्रा. एस. एन. खडपकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

यानिमित्त आयोजित केलेल्या 'शाहू महाराज-व्यक्ती आणि कर्तृत्व' या विषयावर आधारीत महाविद्यालयीन स्तरावरील वक्तृत्व स्पर्धेत मीना कुडचिरकर, प्रीती गवस, अक्षय राऊत यांनी अनुक्रमे प्रथम तीन, तर वंदना पटकारे हिंने उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविला. (वार्ताहर)